महाराष्ट्र शासन
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी (महाराष्ट्र)
प्रशासकीय ईमारत, वसमत रोड, परभणी-431402
कुलसचिव कार्यालय

सत्यमेव जयते

कृषि मूलं हि जीवनम्

ईमेल : reg_mau@redifmail.com
संकेतस्थळ : www.vnmkv.ac.in

दुरध्वनी (02452) 229755
फॅक्स: (02452) 229755,223582

**वर्तमानपत्राचे नावे सुचविण्यासाठीच्या प्रस्तावात निधीबाबत व इतर बाबीचा स्पष्ठ उल्लेख करणे बाबत..**

## परिपत्रक

जा.क्र.वर्त.ना.-२०२५/साप्रवि-४/१९८/3464 दिनांक. 26.06.२०२५

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, विविध कार्यालयाकडून विविध कामाच्या ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन इत्यादी प्रसिध्द करण्यासाठी वर्तमानपत्राचे नावे कळविणे बाबतचे प्रस्ताव कुलसचिव कार्यालयास प्राप्त होतात. त्यानुसार रोटेशनप्रमाणे संबंधीत कार्यालयास वर्तमानपत्राचे नावे कळविले जातात.

परंतु काही प्रस्ताव अपुर्ण असतात, त्यामध्ये सदर कामाबाबत लागणाऱ्या निधीचा अथवा योजनेचा उल्लेख नसतो किंवा त्यास खर्चास मंजुरी सोबत जोडलेली नसते. तसेच ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन पुर्ण करण्यासाठी गठीत समितीची शिफारस केलेली दिसुन येत नाही. अशा अनेक बाबींचा उल्लेख नसतो, म्हणून खालील बाबी नमुद करूनच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

१. ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन/इत्यादी प्रसिध्द करण्याच्या प्रस्तावाला मा.कुलगरू महोदय तसेच आवश्यकतेनुसार कार्यकारी परिषद/कृषि परिषद/महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेतल्याची विहीत कागदपत्रे सोबत जोडून प्रस्तावा सादर करण्यात यावा.
२. सदर कामासाठी होणाऱ्या खर्चास आपले नियंत्रन अधिकारी यांचे मार्फत मान्यता घेवूनच प्रस्ताव सादर करण्यात यावा.
३. सदर कामासाठी होणारा खर्च कोणत्या योजनेतून/आर्थीक वर्षातुन होणार आहे याबाबत नमुद करून प्रस्ताव सादर करण्यात यावेत.
४. तसेच ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन/इत्यादी प्रसिध्द झाल्या नंतर त्या वर्तमानपत्राची एक प्रत कुलसचिव कार्यालयास सादर करण्यात यावी.
५. ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन/इत्यादी वर्तमानपत्रातुन प्रसिध्द झाल्यानंतर त्याचे देयक अदा करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची असेल.
६. ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन/इत्यादी परस्पर वर्तमानपत्रातुन प्रसिध्दीस देण्यात येवू नये, कुलसचिव कार्यालयाकडून कळविलेल्या वर्तमानपत्रातुनच प्रसिध्द करण्यात यावेत.
७. बऱ्याच कार्यालय प्रमुखाकडून व्हॉटॲपच्या माध्यमातून प्रस्ताव पाठवून वर्तमानपत्राचे नाव तात्कळ कळविण्यात यावे असे कळवीले जाते. असे न करता ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन इत्यादी प्रसिध्द करण्यासाठी नावे कळविण्याबाबतचा प्रस्ताव योग्य माध्यमाद्वारे कमित-कमी १५ दिवस अगोदर पाठविण्यात यावेत.

८. वृत्तपत्राने किंवा कार्यालयाच्या तांत्रीक अडचणीमुळे ई-निविदा/सुचना/जाहिर प्रगटन इत्यादी न छापल्यास व तीच जाहिरात पून्हा प्रसिध्दीस द्यावयाची असल्यास तसा उल्लेख आपल्या पत्रात करावा.

उपरोक्त बाबींचा उल्लेख करुनच वर्तमानपत्राचे नावे सुचविण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

**मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने,**

(संतोष वेणीकर)
**कुलसचिव**

**प्रत** १. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी आधिष्ठाता (शिक्षण) वनामकृवि, परभणी वनामकृवि, यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुखाच्या निर्देशनास आणून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करावे.

२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी कार्यवाहीस्तव.

३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

४. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव.

Computer center